RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक १३] बुधवार, जून २५, २०२५/आषाढ ४, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.**—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | **पृष्ठे** १-३ |

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २५ जून २०२५.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VI OF 2025.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

**सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; २०१५चा महा. २८.

**त्याअर्थी**, **आता**, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ याच्या कलम २ मधील, खंड (ढ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— २०१५ चा महा. २८.

"(ढ) "अनिवासी भारतीय (एनआरआय)" याचा अर्थ, जी व्यक्ती, आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (६) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, "सर्वसाधारण रहिवासी नाही" आणि त्यानुसार जिला, विदेशातील भारतीय राजदूतावासाकडून किंवा केंद्राकडून अनिवासी भारतीय प्रमाणपत्र देण्यात आले आहे ती व्यक्ती, असा आहे आणि त्यात, पालक आणि पाल्य अधिनियम, १८९० अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, तिच्या बालकाचा किंवा पाल्याचा समावेश होतो;". १९६१ चा ४३. १८९० चा ८.

## निवेदन

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) यामध्ये महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद केली आहे.

२. या अधिनियमामध्ये, इतर गोष्टींबरोबरच, अनिवासी भारतीय (एनआरआय) कोट्याअंतर्गत व्यावसायिक शैक्षणिक पाठ्यक्रमांमध्ये प्रवेशासाठी जागांचे वाटप करण्याची तरतूद केली आहे. उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ढ) मध्ये "अनिवासी भारतीय (एनआरआय)" या संज्ञेची व्याख्या केली आहे.

३. खरे अनिवासी भारतीय उमेदवार, महाराष्ट्र राज्यातील अनिवासी भारतीय (एनआरआय) कोट्याअंतर्गत व्यावसायिक शैक्षणिक पाठ्यक्रमांमध्ये प्रवेश मिळविण्याच्या संधीपासून अनेकदा वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणून, उक्त अधिनियमातील अनिवासी भारतीय (एनआरआय) या संज्ञेच्या व्याख्येत सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते, जेणेकरून ही व्याख्या, पी. ए. इनामदार या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या कायद्याशी सुसंगत असावी, ज्यामध्ये असे देखील प्रतिपादन केले आहे की,—

"जे लोक इतर देशांमध्ये स्थलांतरित झालेले आहेत, त्या भारतीय वंशाच्या लोकांची, त्यांच्या मुलांना त्यांच्या स्वतःच्या देशात राहून केवळ शिक्षणच मिळत नाही तर, भारतीय सांस्कृतिक मूल्यांशीदेखील ते पुन्हा जोडले जात असल्याने, त्यांच्या मुलांना त्यांच्या स्वतःच्या देशात परत आणण्याची इच्छा असते. त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर ते इतरत्र खर्च करणार असलेला पैसा त्यांच्या स्वतःच्या मातृभूमीपर्यंत पोहोचावा अशी-देखील त्यांची इच्छा असते. आमच्या मते, १५% पेक्षा अधिक नसलेले अशा जागांचे मर्यादित आरक्षण, दोन शर्तींच्या अधीन राहून व्यवस्थापनाच्या स्वेच्छानिर्णयानुसार, अनिवासी भारतीयांना (एनआरआय) उपलब्ध करून देता येईल. प्रथम, अशा जागांचा वापर केवळ अनिवासी भारतीयांना (एनआरआय) आणि त्यांच्या मुलांसाठी किंवा पाल्यांसाठी प्रामाणिकपणे झाला पाहिजे. दुसरे म्हणजे, या कोट्यात, गुणवत्तेला पूर्णपणे फाटा देऊ नये.".

४. २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्यातील विविध व्यावसायिक शैक्षणिक पाठ्यक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होईल. म्हणून, उक्त अधिनियमामध्ये तात्काळ सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २४ जून २०२५.

**सी. पी. राधाकृष्णन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. वेणुगोपाल रेड्डी,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.